**<u>अर्जदाराकरीता अर्जदार साक्षीदार क्र. २ चा शपथेवर</u>**

**<u>पुढील सरतपास विधीज्ञ श्री. आर. पी. जाधव यांचेद्वारा.</u>**

६. आज रोजी मी माझ्या पी. एफ. स्लीप, आधार कार्ड व पॅन कार्ड च्या प्रती प्रकरणात दाखल केलेल्या आहेत. ते निशाणी–४७ ते निशाणी–५० वर आहेत.

**<u>प्रथम पक्षकार क्र. १ तर्फे द्वितीय पक्षकार साक्षीदार क्र. २ चा</u>**

**<u>शपथेवरील उलटतपास विधीज्ञ श्री. मोहोळकर यांचेमार्फत सुरू.</u>**

७. मला कंपनीने नेमणूक आदेश दिलेला होता. मी माझा नेमणूक आदेश दाखल करू शकत नाही. माझी नेमणूक Assistant Supervisor / Servicing Incharge म्हणून केल्याबाबत कंपनीने मला नेमणूक आदेश दिला होता. तो नेमणूक आदेश मी दाखल करू शकत नाही. मी Milking Department चा इन्चार्ज असल्याबाबत कंपनीने मला पत्र दिले होते. ते पत्रदेखील मी दाखल करू शकत नाही.

८. हे म्हणणे खरे आहे की, मी कंपनीत Assistant Supervisor/Servicing Incharge & Milking Department चा इन्चार्ज असल्याबाबत माझ्या शब्दाशिवाय इतर कागदोपत्री पुरावा नाही. कंत्राटी कामगार माझ्या नियंत्रणाखाली काम करतील याबाबत कंपनीने मला कोणतीही लेखी सुचना अगर आदेश दिलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, तरीदेखील मी द्वितीय पक्ष कामगारांच्या कामावर नियंत्रण ठेवत होतो.

९. हे म्हणणे खरे आहे की, पी. एफ. स्लीपवर कामगारांचे व कंपनीचे नाव असते. सदरचे प्रकरण डीलावल कंपनीबाबतचे आहे. आज रोजी जी मी पी. एफ. स्लीप दाखल केली आहे त्यावर डेरी फार्म इक्वीपमेंटस असे नमूद आहे.

१०. हे म्हणणे खरे आहे की, कंपनीत दिवसभरात होत असलेल्या कामाची नोंद जॉबकार्डवर होत होती. हे म्हणणे खरे आहे की, जॉबकार्डवर कामगार व सुपरवायजर यांची सही होती. हे म्हणणे खरे नाही की, या प्रकरणात दाखल जॉबकार्ड हे रिवर्क /रिजेक्शन बाबत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, जॉबकार्डवर कामगाराने रिवर्क / रिजेक्शनच्या कामाची नोंद केली आहे व त्यावर मी सुपरवायजर म्हणून सही केली

आहे. हे म्हणणे खरे नाही की, जॉबकार्डवर फक्त रिवर्क / रिजेक्शनच्या कामाची नोंद आहे व उत्पादन केल्याची नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणात दाखल जॉबकार्डवर Stock taking, Material handling, house keeping, Cleaning the bur, cleaning the fan etc. अशा कामाची नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, हे काम डीलावल कंपनीचे उत्पादनाचे काम नाही.

११. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगत आहे की, कंपनीत १०० पेक्षा अधिक कामगार काम करीत होते.

१२. कंपनी सन २००९ मध्ये बंद पडल्यामुळे सन २००९ मध्ये माझी नोकरी संपुष्टात आली. हे म्हणणे खरे आहे की, लक्ष्मण बाजीराव नांगरे उर्फ राजेंद्र नांगरे हे माझे भाउ आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी, माझा भाउ व मुबारक काझी यांनी के.पी.टी. / न्यू के.पी.टी. कंपनी स्थापन केली होती. मला माहीत नाही की, माझा भाउ व मुबारक काझी हे या कंपनीत भागिदार आहेत किंवा कसे. मी मुबारक काझी यांना ओळखतो. मला माहीत नाही की, ते सध्या काय करतात. हे म्हणणे खरे नाही की, द्वितीय पक्ष कामगार व माझी ओळख असल्यामुळे मी त्यांच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटया आशयाचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास – संपला.**
**फेरतपास – काही नाही.**

समक्ष / श्रवणोत्तर स्वीकृत
वा.दा.व.अ.क.के

ठिकाण – सातारा.
दिनांक – २०/०२/२०२६

( निखिल अ. गुप्ता )
पिठासीन अधिकारी,
कामगार न्यायालय, सातारा.